महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

"प्रशासन समन्वयक" या पदासाठी जाहिरात.

शासकीय सेवेतील कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांचेकडून मा.संचालक मंडळाचा ठराव क्र.१५४/९, दि.२२.१०.२०२० व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१०.०६.२०२५ अन्वये खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मुलाखतीद्वारे ३ वर्षाच्या कालावधीकरीता करार पद्धतीने भरण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

अ. क्र	पदाचे नाव	पद संख्या	अर्हता	पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या
१	प्रशासन समन्वयक	१	मंत्रालयीन कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी	महामंडळातील आस्थापना विषयक बाबी, सेवा प्रवेश नियम, पदांचा आढावा, सेवा-शर्ती नियम, अनुकंपा, बिंदू नामावली, आश्वासित प्रगती योजना, सरळसेवा भरती, पदोन्नती आवश्यकते नुसार इतर विवक्षित कामे व वरिष्ठांनी वेळोवेळी सुचविलेली कामे करणे.

१. अर्हता:- अ) शासन सेवेतील जानेवारी २०२२ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत सेवा निवृत्त झालेले अधिकारी.
ब) शारीरिक व बौध्दिकदृष्ट्या कार्यक्षम असणे आवश्यक.
क) मराठी, हिंदी आणि इंग्रजी लिहिण्या व वाचण्याची क्षमता आवश्यक.
ड) कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी झालेली, प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावी.

२. वित्तलब्धी :- सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१०.०६.२०२५ च्या तरतूदीनुसार

३. अर्जाचा नमुना व इतर अनुषंगीक बाबी महामंडळाच्या www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील अर्हता धारण करण्याऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, सेवेत असताना सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यार्थ आवश्यक त्या (उदा. सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन प्रमाणपत्र) साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑनलाईन दि. २१.१०.२०२६ सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जाची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

"प्रशासन समन्वयक" या पदासाठी अर्जाचा नमुना :-

१	अर्जदाराचे नाव	
२	अर्ज करत असलेल्या पदाचे नाव	
३	जन्म तारीख	
४	पत्रव्यवहारासाठीचा पत्ता	
५	ई-मेल	
६	दूरध्वनी / मोबाईल क्रमांक	
७	शैक्षणिक अर्हता	
८	सेवा निवृत्ती दिनांक व सेवा कालावधी	
९	निवृत्तीच्यावेळी कार्यरत असलेल्या कार्यालयाचा तपशील व कालावधी	
१०	सेवा निवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद	
११	विभागीय चौकशी झालेली / प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे याचा तपशिल	
१२	सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन मिळत असल्यास निवृत्ती वेतन प्रमाणपत्र	

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी